# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## औरंगाबाद

परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधित पदवीधारक स्नातकांना (Degree Holder), पालक व सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व प्राध्यापक यांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टल अतंर्गत शिक्षक भरती करिता शुक्रवार, दि. २२.०९.२०२३ रोजीपर्यत आवेदन पत्र सादर करण्यासाठीची अंतीम मुदत असल्याचे समजले आहे.

**मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षक भरतीकरिता पदवीधारक स्नातकांनी (Degree Holder) पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केले असुन त्यांना विद्यापीठामार्फत प्रत्यक्ष पदवी वितरीत करण्यात आल्या आहेत. तथापि, अजूनही काही स्नातकांना (Degree Holder) पदवीसाठी अर्ज करावयाचे आहेत अशा स्नातकांनी (Degree Holder) बुधवार, दि. २०.०९.२०२३ रोजीपर्यंत प्रचलित पध्दतीप्रमाणे अर्ज सादर करावेत. सदर तारखेच्या आत आलेल्या पदवी प्रमाणपत्र अर्जावर अर्ज सादर केल्याच्या पुढील ०२ (दोन) दिवसांच्या आत कार्यवाही करण्यात येईल.**

दि. २०.०९.२०२३ रोजीनंतर प्राप्त होणारे पदवी प्रमाणपत्राच्या अर्जावर विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे १५ दिवसांनी प्रत्यक्ष किंवा नोंदणीकृत टपालाव्दारे पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल.

करिता, सर्व पात्र पदवी धारक स्नातकांनी (Degree Holder) उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करावे.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद :
संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/पदवीप्रदान/२०२३/1252 :
दिनांक : १४.०९.२०२३ (15) :

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**